20260427131047

37/NS

**सामाजिक विकास कक्ष**
**२१ जानेवारी, २०२६**

**विषय** :- मौजे मजास न.भू.क्र. १७५अ/४ (पार्ट) येथे त्रिचरण सप्तकार सहकारी गृहनिर्माण संस्था येथील रहिवाशांचे पुनर्वसन करणेबाबत.

**संदर्भ** :- १)श्री. अनंत (बाळा) भिकू नर, मा. आमदार जोगेश्वरी (पूर्व) यांचे मा. महानगर आयुक्त यांना सादर केलेले दि. २०/०८/२०२५ रोजीचे पत्र. 191/C
२)प्राधिकरणाच्या एस.आर.ए. कक्षाकडील दि. ०६/०१/२०२६ रोजीची टिपणी. 35/NS

जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रातील कोकण नगर, मौजे मजास न.भू.क्र. १७५अ/४ (पार्ट) या भूभागावर असलेल्या त्रिचरण सप्तकार सहकारी गहनिर्माण संस्था (नियोजित) हि झोपडपट्टी सन, १९९५ पूर्वी पासून असून सदर ठिकाणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून पुनर्वसन वसाहत निर्माण केली आहे. त्या वसाहतीच्या खेळाच्या मैदानासाठी (Recreation Ground) आरक्षित असलेल्या जागेवर सदर झोपडे असून त्या संरक्षित असल्याने त्यांचे प्राधिकरणामार्फत पुनर्वसन करण्यात यावे अशी विनंती श्री. अनंत (बाळा) भिकू नर, मा. आमदार महोदय यांनी केली आहे. 191/C

कोकण नगर मजास पुनमनगर जोगेश्वरी येथील सि.टी.एस. क्र.१७५/ए/४ वरील प्लॉट (एकूण क्षेत्रफळ १९,२८४ चौ. फुट) त्यामधील मनोरंजन उद्यानासाठी (Recreation Ground) आरक्षित १५% (क्षेत्रफळ २८५४ चौ.फुट) आहे. उर्वरीत प्लॉटचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुं.म.प्र.वि.प्राधिकरणास दि.८/०१/२००३ रोजी एमयुटीपी प्रकल्पग्रस्ताच्या पुनर्वसनाकरीता इमारती बांधणेकामी देण्यात आलेला आहे. सदर प्लॉटवर मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाने पुनमनगर वसाहत विकसित केली आहे. सदर वसाहतीत इमारतीचे बांधकाम करुन सदर इमारतीत प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पाने बाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले आहे.

मा. आमदार महोदय पुनर्वसनाची मागणी करीत असलेले झोपडीधारक हे प्राधिकरणाच्या पुनमनगर येथील विकसित पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखडयातील मनोरंजन उद्यानासाठी (Recreation Ground) आरक्षित असलेल्या प्लॉटवरील अतिक्रमित झोपडीधारक आहेत. सदर झोपडीधारकांचे पुनर्वसन करावयाच्या प्रस्तावास तत्कालीन मा. महानगर आयुक्त यांची दिनांक १४/०३/२०१६ रोजी मान्यता असल्याचे दिसून येते. 7/NS

प्राधिकरणाच्या पुनगनगर पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखडयातील प्रस्तावित उद्यान व त्यामधील अतिक्रमण असलेल्या झोपडयांची प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी यांचेमार्फत सुधारीत शासन निर्णयानुसार पात्रता निश्चित करुन झोपडीधारकांचे पुनर्वसन करावयाचे प्रस्तावित असल्याने सदर झोपडयांचे सर्वेक्षण करण्याकरिता मे. कोमल इंजिनियरिंग या सर्वेक्षण संस्थेस दि. २०/१२/२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आले आहे. 87/C त्यानुसार सर्वेक्षण संस्थेनी दि.२०/०६/२०१९ रोजी सर्वेक्षण करुन सर्वेक्षण यादी सादर केली. त्यामध्ये १३६ प्रकल्पग्रस्तांचा समावेश आहे. परंतु सदर सर्वेक्षण अहवालामध्ये काही तांत्रिक त्रुटी असल्यामुळे तसेच कार्यादेशातील नमूद असलेली अपूर्ण माहितीची पुर्तता करण्यासंदर्भात मे. कोमल इंजिनियरिंग या सर्वेक्षण संस्थेस दि. २७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार सर्वेक्षण संस्थेने 139/C 165/C

Scanned with OKEN Scanner

दि.११/०९/२०२० रोजी पत्र सादर केले असून त्यामध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे याबाबत जोपर्यंत लेखी स्वरुपात आश्वासन देण्यात येत नाही तोपर्यंत झोपडीधारकांमार्फत कोणतेही पुरावे सादर करण्यात येणार नाही अशी भुमिका झोपडीधारकांनी घेतल्यामुळे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आलेले नाही असे कळविले आहे. त्यामुळे सदर झोपडीधारकांचे सर्वेक्षणाची प्रक्रिया पुर्ण करता आली नसल्याने त्यांची पात्रता व पुनर्वसन करता आले नाही अशी सद्यस्थिती आहे.

प्राधिकरणाच्या पुनमनगर येथील विकसित पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखड्यातील मनोरंजन उद्यानासाठी (Recreation Ground) आरक्षित असलेल्या प्लॉट वरील अतिक्रमीत झोपडीधारकाचे प्राधिकरणामार्फत पुनर्वसन करावयाचे झाल्यास झोपडीधारकांचे पुनश्च सर्वेक्षण करुन व प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांच्या मार्फत सुधारित शासन निर्णयानुसार पात्रता निश्चित करुन पात्र ठरलेल्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करावे लागेल. तत्पुर्वी प्राधिकरणाच्या एस. आर. ए. कक्षाकडील अभिप्राय घेणे उचित होईल. याकरीता पुनमनगर येथील पुनर्वसन वसाहत आपल्या विभागामार्फत विकसित करण्यात आली आहे का?, विकासक आपण आहोत का?, त्यावेळी सदर झोपडया अस्तित्वात होत्या का?, सदर प्लॉट सद्यस्थितीत कोणाच्या मालकीचा आहे?, सदर ठिकाणी झो.पु. योजना राबविण्यात येईल का? तसेच सदर अतिक्रमित झोपडीधारकांचे प्राधिकरणामार्फत पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने सुस्पष्ट अभिप्राय घेणेबाबत नस्ती एस.आर.ए. कक्षाकडे अग्रेषित करण्यात आली होती.

या अनुषंगाने एस.आर.ए. कक्षाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत त्यामध्ये मजास पुनमनगर येथील न.भू.क्र. १७५अ/४(पार्ट) येथील वसाहत प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागामार्फत विकसित करण्यात आली असून विकासक प्राधिकरण आहे. सदर वसाहतीच्या विकास आराखड्यातील मनोरंजन उद्यानासाठी (Recration Ground) राखीव असलेल्या प्लॉटवर अतिक्रमित झोपड्या या याजेना मंजूर झालेल्या सन २००३ सालापासून असल्याचे नमूद केले आहे. तसेच सद्यस्थितीत मनोरंजन उद्यानसाठी (Recration Ground) राखीव असलेला प्लॉट दि. ०८/०८/२०१९ च्या नविन पी. आर कार्डनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचा असल्याचे एस. आर. ए. कक्षाकडून कळविले आहे. तसेच सदर ठिकाणी झो.पु.प्रा. बृहन्मुंबई यांनी एस. आर. योजना प्रस्तावित केली होती. या अनुषंगाने कार्यकारी अभियंता के पूर्व यांनी याबाबत अभिप्राय मागविले असता प्राधिकरणाच्या एस. आर. कक्षाकडून असे कळविण्यात आले आहे कि, सदर आर. जी . प्लॉट खुले ठेवणे बंधनकारक असून ते रहिवाशांच्या मनोरंजनासाठी वापरण्यात येईल. तसेच सदर योजनेत संबंधीत भूखंडाची संपूर्ण एफ. एस. आय क्षमता आधीच वापरलेली आहे त्यामुळे त्या ठिकाणी झो.पू योजना राबविता येत नाही. तसेच अतिक्रमित झोपड्यांचे पुनर्वसन हा भाग सामाजिक विकास कक्षाशी संबंधीत असल्याने याबाबत सा.वि.कक्षामार्फत कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे अभिप्राय प्राधिकरणाच्या एस.आर.ए. कक्षाने दिले आहेत.

Scanned with OKEN Scanner

30/NS

मौजे मजास न.भू.क्र. १७५अ/४(पार्ट) येथील मनोरंजन मैदानसाठी (Recration Ground) आरक्षित असलेल्या प्लॉटमधील त्रिचरण सप्तकर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अतिक्रमित झोपड्याचे पुनर्वसन करणेकरीता श्री. अनंत (बाळा) भिकू नर मा. आमदार सतत पाठपुरावा करीत असल्याने व एस. आर. ए. कक्षाकडील अभिप्रायाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) मनोरंजन उद्यानासाठी (Recration Ground) आरक्षित असलेल्या प्लॉटवरील अतिक्रमित झोपड्याचे सर्वेक्षण मे. कोमल इंजिनिअरिंग या सर्वेक्षण संस्थेने सन २०१९ साली केले आहे. परंतु सद्यस्थितीत तेथील झोपड्याची संख्या वाढल्या असल्याची शक्यता असल्याने व झोपड्याची खरेदी विक्री झाल्याची शक्यता असल्याने पुन्हा मे. कोमल इंजिनियरिंग मार्फत सर्वेक्षण करणे.

२) सर्वेक्षणानुसार अतिक्रमित झोपड्यांची प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत सुधारीत शासन निर्णयानुसार पात्रता निश्चित करणे.

३) प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांनी पात्र ठरविलेल्या झोपडीधारकांचे सदनिकांच्या उपलब्धतेनुसार पुनर्वसन करण्यात येईल.

उपरोक्त अनु क्र. १, २ व ३ वरील प्रस्ताव मान्यतेकरीता सविनय सादर.

सामाजिक विकास कक्ष
आवक क्र. 843
दिनांक: 06/02/26

21/1/2026
स.वि.अ.(श्री. तोगरे)

वरिष्ठ समाज विकास अधिकारी (श्री. मोहिते) 21/01/26

उपजिल्हाधिकारी (श्री. शिंदे)

मा. प्रमुख, सामाजिक विकास कक्ष
तथा अप्पर जिल्हाधिकारी

Addl. MC (I) & PD's Office
No: 106
Date: 23/01/2026

मा. अति. महानगर आयुक्त - १ 27/1

मा. महानगर आयुक्त

As verified and proposed

MC OFFICE
No.:- 223
Date:- 30/01/26

CISDC
श्री. तोगरे
6/2